**पंचायत समितीची मासिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक १५/०७/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पंचायत समिती कार्यालय श्रीवर्धन महाराष्ट्र भूषण आदरणीय तीर्थ.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेणेंत आली. त्या सभेचे इतिवृत्त भाग-१ व २**

जा.क्र.पंसश्री/प्रशासन/वशी/१/          /२०२६
पंचायत समिती कार्यालय, श्रीवर्धन
दिनांक          /          /२०२६

प्रति,

मा.श्री/श्रीमती.............................................................................................
पंचायत समिती सभापती/ उपसभापती/ सदस्या/ सदस्य
मु.पो...............................................तालुका श्रीवर्धन, जि.रायगड

प्रत- माहितीसाठी सविनय सादर.

१. मा. खासदार श्री. सुनिलजी तटकरे साहेब, गीताबाग मु.सुतारवाडी पो.जामगांव, ता.रोहा, जि.रायगड
२. मा. आमदार कु.अदिती सुनिल तटकरे मॅडम,गीताबाग मु.सुतारवाडी पो.जामगांव, ता.रोहा,जि.रायगड
३ मा. अध्यक्ष सोा. रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
४. मा. उपाध्यक्ष सोा. रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
५. मा. सभापती सोा................................................समिती रायगड जिल्हा परिषद अलिबाग
६. मा. विरोधी पक्षनेता रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
७. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
८. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
९. मा. खाते प्रमुख (सर्व)...............................................................रा.जि.प. अलिबाग.

प्रत:- माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

प्रत :- पंचायत समितीमधील सर्व शाखा प्रमुख, शाखा / कनिष्ठ अभियंता (बांधकाम /एस्.एस्.ए.)
सहाय्यक / कनिष्ठ लेखाधिकारी, कृषि अधिकारी (जनरल /वि.घ.यो.)
विस्तार अधिकारी (सर्व).....................................पंचायत समिती श्रीवर्धन.

सचिव तथा गट विकास अधिकारी (वर्ग - १)
पंचायत समिती श्रीवर्धन

**पंचायत समितीची मासिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक १५/०७/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पंचायत समिती कार्यालय श्रीवर्धन महाराष्ट्र भूषण आदरणीय ती.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेणेंत आली. त्या सभेचे इतिवृत्त भाग-१ व २**

**इतिवृत्त भाग १**

| सभेची तारीख व वेळ | उपस्थित सदस्य | उपस्थित अधिकारी / कर्मचारी |
|---|---|---|
| दिनांक १५/०७/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता | १) मा.श्री. सचिन नंदाकर किर सो.<br>सभापती पंचायत समिती.<br>२) मा.श्रीम.पुजा प्रशांत शिंदे सो.<br>उपसभापती पंचायत समिती<br>३) मा.श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर सो.<br>पंचायत समिती सदस्य<br>४) मा.श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे<br>पंचायत समिती सदस्य | १) सचिव तथा गट विकास अधिकारी,पं.स.श्रीवर्धन<br>२) पशुधन विकास अधिकारी, पं.स.श्रीवर्धन<br>३) तालुका आरोग्य अधिकारी,श्रीवर्धन<br>४) उपअभियंता (ग्रा.पा.पु.),रा.जि.प.उपविभाग,म्हसळा<br>५) उपअभियंता (बांध.) (प्र),रा.जि.प.उपविभाग,श्रीवर्धन<br>६) बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.से.यो.श्रीवर्धन<br>७) गट शिक्षणाधिकारी (प्र),पं.स.श्रीवर्धन<br>८) तालुका कृषी अधिकारी,श्रीवर्धन (प्रतिनिधी)<br>९) विस्तार अधिकारी (पंचायत) १ पं.स.श्रीवर्धन<br>१०) विस्तार अधिकारी (आरोग्य) (प्र.),पं.स.श्रीवर्धन<br>११) विस्तार अधिकारी (कृषी) (प्र.),पं.स.श्रीवर्धन<br>१२) सहाय्यक लेखाधिकारी,पं.स.श्रीवर्धन (प्रतिनिधी)<br>१३) शाखा अभियंता,पं.स.श्रीवर्धन (प्रतिनिधी)<br>१४) कनिष्ठ अभियंता,पं.स.श्रीवर्धन<br>१५) सहाय्यक प्रशासन अधिकारी, (प्र) पं.स.श्रीवर्धन<br>१६) कनिष्ठ प्रशासन अधिकारी,पं.स.श्रीवर्धन<br>१७) पशुधन पर्यवेक्षक,पं.स.श्रीवर्धन.<br>१८) गटसन्वयक (MSRLM) (प्र.) ,पं.स.श्रीवर्धन<br>१९) कनिष्ठ सहाय्यक (प्रशासन),पं.स.श्रीवर्धन |

**पंचायत समितीची मासिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक १५/०७/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पंचायत समिती कार्यालय श्रीवर्धन महाराष्ट्र भूषण आदरणीय तीर्थ.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेणेंत आली. त्या सभेचे इतिवृत्त भाग-१ व २**

## संक्षिप्त इतिवृत्त भाग-१

सभेच्या प्रारंभी मा.श्रीम.पुजा प्रशांत शिंदे सो.पं.स.उपसभापती श्रीवर्धन यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण केला व सर्वानी राष्ट्रगीत / महाराष्ट्र गीत म्हटले.

श्री.मंगेश साळी सचिव तथा सहाय्यक गट विकास अधिकारी यांनी पंचायत समितीचे सर्वसाधारण सभेस उपस्थित मा.श्री. सचिन नंदाकर किर सो.सभापती, मा. श्रीम.पुजा प्रशांत शिंदे सो. उपसभापती, मा. श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर सो, पं.स.सदस्य, मा.श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे सो, पं.स.सदस्या, यांचे पंचायत समितीच्या वतीने स्वागत केले तसेच सभेस उपस्थित सर्व खाते प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांचे पंचायत समितीच्या वतीने स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करावी अशी विनंती मा.सभापती सो यांना केली.

मा.श्री. सचिन नंदाकर किर सो., सभापती यांनी सभेस उपस्थित मा.श्रीम.पुजा प्रशांत शिंदे सो.उपसभापती, मा. श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर सो. पं.स.सदस्य, मा.श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे,पं.स.सदस्या, मा. श्री.मंगेश साळी सहाय्यक गट विकास अधिकारी तथा सचिव यांचे पंचायत समितीच्या वतीने स्वागत केले तसेच उपस्थित सर्व खातेप्रमुख अधिकारी व कर्मचारी यांचे देखील पंचायत समितीच्या वतीने स्वागत केले. त्यानंतर मा.सभापती यांनी सहाय्यक गट विकास अधिकारी तथा सचिव यांना सभेचे कामकाजास सुरूवात करणेबाबत सुचित केले.

## दु:खवटा ठराव

१) येथील कै. श्रीम.नमिता निळकठ सातनाक यांचे दिनांक २९/०६/२०२६ रोजी आकस्मिक निधन झालेबद्दल. निधन झालेल्या व्यक्तीच्या मृतात्म्यास चिरशांती लाभावी म्हणून सभागृहात श्रध्दांजली वाहणेत आली.

## अभिनंदन ठराव

अभिनंदनाचे ठराव नव्हते.

**विषय क्र १ :-** मागिल मासिक सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
मागिल मासिक सभेचे इतिवृत्ताचे वाचन श्री.मंगेश साळी सचिव तथा सहाय्यक गट विकास अधिकारी यांनी केले व ते सर्वानुमते मंजूर करणेंत आले.

**विषय क्र २ :-** मागिल मासिक सभेतील ठराव पूर्ततेचा आढावा घेणे.
मागिल मासिक सभेतील ठरावावरील व चर्चेवरील केलेल्या कार्यवाहीचे वाचन श्री.मंगेश साळी सचिव तथा सहाय्यक गट विकास अधिकारी यांनी केले व ठराव पूर्ततेचा आढावा घेणेंत आला.

**विषय क्र ३ :-** मा.सदस्यांनी विचारलेल्या लेखी प्रश्नांना उत्तरे देणे.
मा.सदस्यांचे लेखी प्रश्न नव्हते.

**विषय क्र ४ :-** मा.सदस्यांचे रजेचे अर्ज मंजूर करणे.
मा.सदस्यांचे रजेचे अर्ज नव्हते.

**विषय क्र ५ :-** महत्वाच्या पत्रव्यवहाराचे वाचन करणे.
महत्वाचे पत्रव्यवहार वाचनासाठी नव्हते.

**विषय क्र. ६ :-** तालुक्यातील खाते प्रमुखांकडील विकास कामांचा आढावा घेणे.

**पशुसंवर्धन :-** पशुधन विकास अधिकारी हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**तालुका आरोग्य अधिकारी :-** तालुका आरोग्य अधिकारी श्री. नारायणकर यांनी त्यांच्या विभागाचा आढावा खालील प्रमाणे दिला.

मा.सदस्य श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे यांनी एका दिवसापूर्वी परिचारिकांच्या झालेल्या अपघाताबाबत विचारणा केली.

यावर तालुका आरोग्य अधिकारी श्री. नारायणकर यांनी अपघातात दोन नर्स जखमी झाल्या असुन गंभीर जखमी असणाऱ्या परिचारिकेवर माणगांव येथे उपचार सुरू असुन किरकोळ जखमी असणाऱ्या परिचारिकेवर श्रीवर्धन येथील रूग्णालयात उपचार सुरू आहेत असे सांगितले. श्री.नारायणकर यांनी त्यांची बदली प्रस्तावित असल्यामुळे त्यांच्याजागी म्हसळा येथील डॉ.श्रीकांत यांच्याकडे चार्ज दिला जाण्याची शक्यता असल्याचे सांगितले.

त्यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी आशासेविका BLO चे काम करतात का असे विचारले.

यावर तालुका आरोग्य अधिकारी श्री.नारायणकर हे "नाही" असे म्हणाले. आयुष्मान कार्डसाठी CSC केंद्रातील डाटा ऑपरेटरची मदत घेऊन ऑनलाईन अर्ज सादर केल्यास ही प्रक्रिया वेगाने पूर्ण होऊ शकेल असे त्यांनी सांगितले. २०,००० आयुष्मान कार्ड बनविण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून ९,००० होणार नसून अद्याप १७,००० कार्ड बनविणे बाकी असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी आयुष्मान कार्डसाठी सर्व ग्राम पंचायतीना पत्र देऊन एक मिटींग आयोजित करावी असे सांगितले.

यानंतर तालुका आरोग्य अधिकारी श्री.नारायणकर यांनी ९६% लसीकरण पूर्ण झाले असून १० वर्षाच्या १८% मुलांचे आणि १६ वर्षांच्या ५.५% बालकांचे लसीकरण झाले असल्याचे त्यांनी सांगितले. शाळा सुरू झाल्यामुळे हे प्रमाण हळुहळु वाढवत नेऊन १००% पर्यंत पोहचवण्याचे लक्ष्य असल्याचे त्यांनी सांगितले. २८ जणांचे HP Vaxin लसिकरण झाले आहे असे त्यांनी सांगितले. MO सगळीकडे असून बागमांडला येथील डॉक्टरांना कार्यमुक्त करण्यात आले आहे व कुडगांव येथे नवीन ANM रूजु झाले असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ.भारत मगर हे अनधिकृत गैरहजर असल्याचे त्यांनी सांगितले. याबाबत जिल्ह्याला त्यांनी माहिती दिलेली आहे मात्र त्यांच्यावर कोणतीही कारवाई झाली नसल्यामुळे याबाबत पत्रव्यवहार केला जावा अशी विनंती त्यांनी केली.

यावर मा.उपसभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे यांनी ग्रामीण भागात डॉक्टर नियमितपणे भेटी देतात का असे विचारले.

यावर तालुका आरोग्य अधिकारी श्री.नारायणकर यांनी CHO ला OPD साठी थांबावे लागते त्यामुळे अती जास्त चिंताजनक स्थिती ज्या रूग्णाची आहे त्यांनाच ते दुपारी भेट देतात असे सांगितले. MPW दिवसाला १०० जणांना भेटी देतात असेही त्यांनी सांगितले.

यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी बोर्ली प्राथमिक आरोग्य केंद्राच्या धोकादायक स्थितीबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे असे विचारले.

यावर तालुका आरोग्य अधिकारी श्री.नारायणकर यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी एका जागेची पाहणी केली होती, मात्र PWD विभागाशी Rate Fixation साठी संपर्क करुनही अद्याप Rate Fixation मिळाले नसल्यामुळे पुढील प्रक्रिया प्रलंबित असल्याचे सांगितले.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन याबाबत गांभीर्याने पाठपुरावा करण्यास ता.आ.अधिकारी यांना सांगितले. भविष्यात काही दुर्घटना झाल्यास संबंधितांची गय केली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ठ केले. प्राथमिक आरोग्य केंद्रा शेजारील प्राथमिक शाळेच्या खोल्या OPD साठी देता येतील का असा प्रश्न त्यांनी विचारला व संबंधित शाळेची पाहणी करण्यास सांगितले.

यावर गट शिक्षणाधिकारी श्री. चव्हाण यांनी फक्त खाजगी कारणासाठी खोल्या देता येत नाही असे सांगताना OPD साठी खोल्या उपलब्ध करून देता येईल असे सांगितले.

त्यानंतर तालुका आरोग्य अधिकारी श्री.नारायणकर यांनी ते गट शिक्षणाधिकारी यांच्यासोबत जाऊन शाळेच्या खोल्यांची पाहणी करतील असे सदस्यांना सांगितले.

**तालुका कृषी :-** तालुका कृषी विभागाचा आढावा तालुका कृषी अधिकारी श्रीम.श्रद्धा डुंबरे यांनी खालील प्रमाणे दिला.

अतीवृष्ठीमुळे नुकसानग्रस्त भागांची पाहणी करून त्या ठिकाणी पंचनामा करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी पंचनामे कशा प्रकारे केले जातात व त्या अंतर्गत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना किती नुकसानभरपाई मिळते असे विचारले.

यावर तालुका कृषी अधिकारी श्रीम.श्रद्धा डुंबरे यांनी NDRF च्या निकषानुसार फळबागांसाठी २२,५००/- रूपये प्रती हेक्टर तसेच भात-नाचणी साठी ८,०००/- रूपये प्रती हेक्टर नुकसानभरपाई दिली जाते असे सांगितले. किमान १,००० रूपये नुकसानभरपाई दिलीच जाते असेही त्यांनी सांगितले.

यानंतर मा.उपसभापती श्रीम पुजा प्रशांत शिंदे यांनी कृषी विभागामार्फत कंपोस्ट खत निर्मितीसाठी जन जागृती केली जाते का असे विचारले.

यावर तालुका कृषी अधिकारी श्रीम.श्रद्धा डुंबरे यांनी याबाबत सहाय्यक कृषी अधिकारी हे जनजागृती करत असल्याचे सांगितले.

यावर मा.सदस्या श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे यांनी प्रत्येक गावात शेतकऱ्यांची भेट घेऊन कृषी सहाय्यक मार्गदर्शन करतात का असे विचारले.

त्यावर तालुका कृषी अधिकारी श्रीम.श्रद्धा डुंबरे या " होय " असे म्हणाल्या. तसेच पेरणीपुर्व मशागत, पेरणी दरम्यान उगवण क्षमता चाचणी तपासणीसाठी मार्गदर्शन तसेच कमी पावसात आणि अतीवृष्ठीमध्ये फळबागांचे संवर्धन कसे करावे याबाबतही कृषी सहाय्यक मार्गदर्शन करतात असे सांगितले.

त्यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी ग्रामसभेला कृषी अधिकारी हजर नसतात असे सांगितले. जर कृषी अधिकारी ग्राम सभेला हजर राहिले तरच शेतकऱ्यांपर्यंत कृषी विभागाच्या योजना पोहोचु शकतात असे सांगताना बऱ्याच ठिकाणी शेतकऱ्यांनी शेतजमिनी कसण्याचे बंद करून बांधकाम व्यवसायाकडे करत आहेत असे सांगितले. शेतीबाबतची ही अनास्था जर पेरणीची आकडेवारी कळाली तर याबाबत प्रयत्न करून येत्या काही काळात दुर करण्याचे प्रयत्न करता येईल असे सांगितले.

यावर तालुका कृषी अधिकारी श्रीम.श्रद्धा डुंबरे यांनी त्यांच्या मार्फत कृषी सहाय्यकांना ग्रामसभेला हजर राहण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत असे सांगितले. तसेच याबाबत पुन्हा सुचना देण्याचे आश्वासन दिले. मागील वर्षी ८० हेक्टर क्षेत्रावर पेरणी झालेली होती मात्र या वर्षी हे प्रमाण ५८ हेक्टर एवढे कमी झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला. पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून गट शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी शेतकऱ्यांचे गट तयार करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच या कार्यक्रमात पंचायत समितीच्या MSRLM विभागाचेही योगदान असुन एकुण ३५ गट सद्यस्थितीला बनविले आहेत असे त्यांनी सांगितले.

यावर मा.उपसभापती श्रीम पुजा प्रशांत शिंदे यांनी भविष्यात शेती व्यवसायावरच अवलंबुन रहावे लागणार आहे आणि त्यामुळे शेतीचा अधिकाधिक विकास कसा करता येईल याबाबत कृषी विभागाने ग्राम सभेमध्ये जनजागृती करावी असे सांगितले.

**उप विभाग बांधकाम :-** श्री. स्वप्निल आंधळे यांनी उप विभाग बांधकाम चा संक्षिप्त आढावा दिला.

खासदार निधीमध्ये १२ कामे मंजूर असुन यापैकी २ कामे पुर्ण झालेली असून १० कामे प्रगतीत आहेत. आमदार निधीमधील ६ कामांपैकी १ काम पूर्ण झाले असून ३ कामे प्रगतीत आहेत व २ कामे निविदा स्तरावर आहेत. ३०५४ अंतर्गत ग्रामीण रस्ते मजबुतीकरणाची एकुण ५ कामे असुन सर्व कामे पुर्ण झालेली आहेत. ५०५४ अंतर्गत ५ जिल्हा रस्त्यांची कामे असून सर्व कामे पूर्ण झालेली आहेत. ५०५४ अंतर्गत साकव बांधकामाची ३ कामे असून १ काम पूर्ण झाले आहे. उर्वरीत २ कामांपैकी १ काम प्रगतीत आहे तर १ काम अद्याप सुरू झालेले नाही. 'क' श्रेणी पर्यटन स्थळ विकास मुलभूत सुविधा करीता अनुदाना अंतर्गत वडवली येथे शंकर मंदिराजवळ रस्ता तयार करण्याचे काम निविदा स्तरावर आहे. 'क' श्रेणी यात्रास्थळ विकासा अंतर्गत ३ कामे मंजूर असून त्यापैकी १ काम पूर्ण झालेले आहे. १ काम प्रगतीत असून १ काम अद्याप सुरू झालेले नाही.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी कोणती कामे मंजुर झाली आहेत असे विचारले.

त्यावर श्री.स्वप्नील आंधळे सहाय्यक अभियंता यांनी असे सांगितले की कुसुमेश्वर मंदिर देवखोल, नागलोली येथे संरक्षण भिंत बांधण्याचे काम निविदा स्तरावर आहे. वेळास आगार काळ भैरव मंदिर जवळ परिसर

सुधारणा सशोभिकरण करणे हे काम पूर्ण झालेले आहे. भरडखोल विठ्ठल मंदिर येथे रस्ता तयार करण्याचे काम अद्याप सुरू झालेले नाही. तहसील कार्यालया वरील पंचायत समिती सभागृहा संदर्भात प्रस्ताव मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर केला असून सदर कामाचे अंदाजपत्रक ३ कोटी रूपयांचे असल्याची माहिती त्यांनी दिली.

मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी यासाठी साधारण किती वेळ लागेल व कार्यालय स्थलांतरीत करण्याची खरोखरच आवश्यकता आहे का? असे विचारले.

यावर श्री.स्वप्नील आंधळे सहाय्यक अभियंता यांनी मान्यतेनंतर यासाठी साधारणत: एक ते दीड वर्षाचा कालावधी लागू शकतो असे सांगितले.

मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी पंचायत समिती इमारत स्थलांतरीत करण्याची गरज असल्याचे मा.खासदार यांचे मत असल्याचे सांगितले.

यावर मा.उपसभापती श्रीम. पुजा प्रशांत शिंदे यांनी विद्यमान इमारत ही चांगल्या स्थितीत असून याच इमारतीला अजून चांगले करता येऊ शकते असे सांगितले.

त्यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी इमारत स्थलांतरा नंतर मा.सभापतींच्या ध्वजारोहण तसेच इतर अधिकारांवर गदा येऊ शकते असे मत मांडताना यावर सर्व पंचायत समिती सदस्यांनी एकत्र बसून विचारविमर्ष करु असे सांगितले. तसेच मागील वेळी चर्चा झाल्याप्रमाणे २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५, २०२५-२६ मधील कामांची यादी दिली आहे का असे विचारले.

यावर श्री.स्वप्नील आंधळे सहाय्यक अभियंता यांनी सदर कामाची यादी दिली आहे असे सांगितले.

यावर मा.सदस्या श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे यांनी शाळा स्लॅपबाबत मागील बैठकीत चर्चा झाली होती त्याप्रमाणे संबंधित ठिकाणी भेटी दिल्या आहेत का असे विचारले.

यावर श्री.स्वप्नील आंधळे सहाय्यक अभियंता " होय " असे म्हणाले.

त्यावर मा.सदस्या श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे यांनी २०२२ च्या कारिवणे सभागृहाच्या बीलाबाबत विचारणा करताना उर्वरीत ८५,००० रूपयांचे बील कसे देणार असे विचारले.

त्यावर श्री.स्वप्नील आंधळे सहाय्यक अभियंता यांनी निधीचे वितरणाबाबत अर्थशाखेकडे माहिती असल्याचे सांगितले.

त्यावर श्री.किशोर नागे विस्तार अधिकारी पंचायत यांनी सभागृहाच्या कामासाठी जो निधी मंजूर झाला होता तो निधी खर्च झाला असून नवीन आराखडे तयार करण्याचे काम सुरू आहे त्यात या कामाच्या बीलाला अंतर्भुत करता येईल असे सांगितले.

यावर मा.सदस्या श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे यांनी याबाबत त्यांना लेखी स्वरूपात माहिती देण्यात यावी असे सांगितले.

त्यावर श्री.स्वप्नील आंधळे सहाय्यक अभियंता यांनी हे " होय " असे म्हणाले.

त्यानंतर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी पंचायत समिती सेस सन २०२५-२६ मधील कामांबाबत विचारले.

त्यावर श्री.स्वप्नील आंधळे सहाय्यक अभियंता यांनी ग्रामपंचायत वावे तर्फे श्रीवर्धन येथील प्रकाश विचारे यांच्या घरापासून सुहास सावंत यांच्या घरापर्यंत काँक्रेटीकरण करणे बाबत चा काम रक्कम रू. १,५०,०००/- हे पुर्ण झालेला आहे. त्याव्यतीरीक्त ग्रामपंचायत आराठी इद्दीतील अंतर्गत रस्ता तयार करणे रक्कम रु. ३७००००/-, व ग्रामपंचायत बागमांडला कोळीवाडा अंतर्गत रस्ता तयार करणे,रक्कम रु. ३७००००/- हे कामांची वर्क ऑर्डर निघाले असून सदर कामास सुरूवात झालेली नाही.

त्यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी पंचायत समिती सेस सन २०२५-२६ मधील ग्रामपंचायत आराठी हद्दीतील अंतर्गत रस्ता तयार करणे रक्कम रु. ३७००००/-, व ग्रामपंचायत बागमांडला कोळीवाडा अंतर्गत रस्ता तयार करणे,रक्कम रु. ३७००००/- ही दोन कामे रद्द करण्यात यावे.

त्यावर सभागृहात चर्चा करून पंचायत समिती सेस सन २०२५-२६ मधील ग्रामपंचायत आराठी हद्दीतील अंतर्गत रस्ता तयार करणे रक्कम रु. ३७००००/-, व ग्रामपंचायत बागमांडला कोळीवाडा अंतर्गत रस्ता तयार करणे,रक्कम रु. ३७००००/- ही दोन्ही कामे रद्द करणेबाबत सर्वानूमते मंजूरी देण्यात आली.

**<u>राज्य परिवहन महामंडळ:-</u>** श्री. हनुमंत पोकळे आगार प्रमुख यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा अहवाल सादर केला.

मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी बस वेळेनुसार पाठविल्या जातात का असे विचारले.

यावर श्री. हनुमंत पोकळे आगार प्रमुख हे " होय " असे म्हणाले.

त्यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी बोरिवली येथे जाणाऱ्या बसेस योग्य वेळेत जातात का असे विचारले मध्यंतरात काही बसेस या वेळेत गेल्या नसून त्यांचा मार्ग बदलु नये असे सांगितले.

त्यावर श्री. हनुमंत पोकळे आगारप्रमुख यांनी पावसामुळे बससेवा विस्कळीत झाल्यामुळे काही बस या वेळेत गेल्या नसल्याचे सांगितले. मात्र आता बस व्यवस्था पूर्वपातळीवर आली असल्याची माहिती दिली. बोरीवली बसच्या मार्गात बदल केला जाणार नाही असे त्यांनी सांगितले.

त्यावर मा.उपसभापती श्रीम पुजा प्रशांत शिंदे यांनी शाळेच्या वेळेनुसार बसचे योग्य नियोजन करण्याची दक्षता घ्यावी असे आगारप्रमुखांना सांगितले.

यावर श्री. हनुमंत पोकळे आग्रारप्रमुख हे " होय " असे म्हणाले.

**<u>म.रा.वि.वि.कं.लि.</u>** :- महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरन कंपनी लिमिटेड चे प्रतिनिधी अनुपस्थित राहिल्यामुळे त्यांच्या विभागाचा आढावा घेता आला नाही.

**<u>सार्वजनिक बांधकाम</u>:-** उप अभियंता (सा.बां.) चे प्रतिनिधी अनुपस्थित राहिल्यामुळे त्यांच्या विभागाचा आढावा घेता आला नाही.

**<u>सार्वजनिक बांधकाम (पर्यटन):-</u>** उप अभियंता (सा.बां.) चे प्रतिनिधी अनुपस्थित राहिल्यामुळे त्यांच्या विभागाचा आढावा घेता आला नाही.

**<u>ए.बा.वि.से.यो</u>:-** बाल विकास प्रकल्प अधिकारी श्री.बागल यांनी ए.बा.वि.से.यो विभागाचा आढावा दिला.

श्रीवर्धन तालुक्यामध्ये ० ते ३ वयोगटातील मुलांची संख्या ७७० असुन ८३९ मुली आहेत. ३ ते ६ वयोगटातील मुलांची संख्या ९०३ तर मुलींची संख्या ८४१ आहे. मुलींची एकूण संख्या १६७३ असुन एकुण मुलांची संख्या १८६० आहेत असे त्यांनी सांगितले. आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यात आरोग्यविषयक तपासणी केली असता ३ तीव्र कुपोषीत बालके आढळली असून त्यापैकी २ बालके जन्मजात दुर्धर आजारामुळे कुपोषीत असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी कुपोषीत बालकांवर उपचार कधीपासून सुरू होणार आहे असे विचारले.

यावर श्री. बागल बाल विकस प्रकल्प अधिकारी यांनी याबाबत कार्यवाहीस सुरूवात झाली असल्याचे सांगताना कुपोषणाच्या तीव्रतेनुसार योग्य उपाययोजना करण्यात येणार आहे असे सांगितले.

त्यावर मा.उपसभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे यांनी कुपोषित बालकांचे जिल्हा स्तरावर उपचार करता येतील का असे विचारले.

यावर श्री. बागल बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी जिल्हा स्तरावर उपचाराची उत्कृष्ठ सुविधा आहे असे सांगितले. मात्र या उपचारासाठी बालकासोबत मातेला थांबावे लागते. यासाठी मातेला दैनिक भत्ताही मिळतो मात्र त्या ठिकाणी राहण्यास महिला तयार होत नाहीत असे त्यांनी सांगितले.

यानंतर मा.उपसभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे यांनी महिलांना आयर्न/लोहाच्या गोळया दिल्या जातात का असे विचारले.

यावर श्री. बागल बाल विकास प्रकल्प अधिकारी हे " होय " असे म्हणाले.

त्यावर मा.उपसभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे यांनी परिचारिका या दर महिन्याला भेट देतात का असे विचारले.

यावर श्री. बागल बाल विकास प्रकल्प अधिकारी हे " होय " असे म्हणाले.

यानंतर मा.उपसभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे यांनी मातृवंदन योजनेचा लाभ किती लाभार्थ्यांना मिळाला आहे असे विचारले.

यावर श्री. बागल बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी याबाबत माहिती घेऊन यादी सादर करतो असे सांगितले.

यानंतर मा.उपसभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे यांनी लोहाच्या गोळयांच्या उपयुक्ततेबाबत पुनरोच्चार करताना सर्व महिलांनी त्या घ्याव्यात असे सूचित केले. तालुका आरोग्य अधिकारी यांनी लोहाच्या गोळ्यांबाबत अधिक माहिती द्यावी असे त्यांनी सांगितले.

यावर श्री.नारायणकर तालुका आरोग्य अधिकारी यांनी कोकण भागात आहारामध्ये मांसाहाराचे प्रमाण अधिक असल्यामुळे या भागातील रहिवाशांमध्ये लोहाची कमतरता शक्यतो आढळत नाही. असे सांगितले तसेच महिला व बाल कल्याण विभागाच्या योगदानामुळे ८०% बालकांपर्यंत याचा लाभ मिळाल्याचेही नमुद केले.

**प्रादेशीक वन विभाग :-** प्रादेशीक वन अधिकारी हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**सामाजिक वनीकरण:-** वन परिक्षेत्र अधिकारी, श्रीवर्धन हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**खारभूमी:-** उप विभागीय अधिकारी खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण उप विभाग, श्रीवर्धन हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**ग्रामिण पाणी पुरवठा :-** उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा हे पनवेल येथे प्रशिक्षणासाठी गेल्यामुळे श्री.भटेश चव्हाण यांनी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचा आढावा पुढील प्रमाणे दिला.

जल जिवन मिशनची कामे सध्या बंद असल्याचे त्यांनी सांगितले तसेच अतीवृष्टीमुळे ज्या ठिकाणी विहीरींचे नुकसान झाले आहे अशा ठिकाणाच्या विहीरींच्या दूरूस्ती करणेबाबतचे प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे सादर करण्याबाबत विभागाला सुचना मिळालेल्या असुन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी महसूल विभागाकडून पंचनामा करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर मा.उपसभापती श्रीम पुजा प्रशांत शिंदे यांनी पुनीर येथील विहिरीच्या स्थितीबाबत विचारणा केली.

यावर श्री.व्यंकटेश माने कनिष्ठ अभियंता यांनी पुनीर येथील विहिर अतीवृष्टी मुळे पुर्णत: खचल्याचे सांगितले.

त्यावर मा.उपसभापती श्रीम पुजा प्रशांत शिंदे यांनी ज्या ठिकाणी जास्त समस्या आहे अशा ठिकाणी अभियंत्यांनी भेट द्याव्यात असे सांगितले.

यावर श्री.व्यंकटेश माने कनिष्ठ अभियंता यांनी आदगांव, वेळास आणि बोर्ली येथे भेटी दिल्या असुन त्या ठिकाणच्या स्थितीची पाहणी केली असुन योग्य ती कार्यवाही सुरू असल्याचे सांगितले.

मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी व मा.सदस्यांनी सुचविलेल्या कामांच्या आराखड्या कार्यवाही करण्यात आली असे विचारले.

त्यावर श्री.किशोर नागे विस्तर अधिकारी पंचायत यांनी सदर आराखडे जिल्हा परिषदेला सादर केल्यानंतर त्यास आगामी बैठकीत १५ दिवसांत मंजुरी मिळु शकते असा अंदाज व्यक्त केला.

त्यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी सर्व सदस्यांनी सुचविलेल्या कामांवर त्वरीत कार्यवाही केली जावी अशा सुचना संबंधित पदाधिकाऱ्यांना दिल्या.

यानंतर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी स्वच्छतेची कामे ही पाणी पुरवठा विभागाकडे न देता संबंधित अधिकार पंचायत समितीकडेच अबाधित रहावेत असे सांगितले.

त्यानंतर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी पंचायत समिती सेस सन २०२५-२६ मधील कामांबाबत विचारले.

त्यावर श्री.व्यंकटेश माने कनिष्ठ अभियंता यांनी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय मेटकरणी श्रीवर्धन कार्यालयाच्या समोर नवीन बोअरवेल मारणे (दायीत्व) रक्कम रु.१,०४,५००/-, रानवली येथे नळ पाणी पुरवठा करिता सौरऊर्जा प्रकल्प करणे,रक्कम रु. ५,००,०००/-, रानवली बौध्दवाडी येथे गटार बांधणे, रक्कम रु.२,५०,०००/- व ग्रामपंचायत वाळवटी हद्दीमध्ये बोअरवेल मारणे, रक्कम रु.१,००,०००/- ही कामे घेण्यात आलेली होती. परंतू सदर कामांचे वर्क ऑर्डर निघालेली नाहीत.

त्यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी पंचायत समिती सेस सन २०२५-२६ मधील तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय मेटकरणी श्रीवर्धन कार्यालयाच्या समोर नवीन बोअरवेल मारणे (दायीत्व) रक्कम रु.१,०४,५००/- रानवली येथे नळ पाणी पुरवठा करिता सौरऊर्जा प्रकल्प करणे,रक्कम रु. ५,००,०००/-, रानवली बौध्दवाडी येथे गटार बांधणे, रक्कम रु.२,५०,०००/- व ग्रामपंचायत वाळवटी हद्दीमध्ये बोअरवेल मारणे, रक्कम रु.१,००,०००/- ही चार कामे रद्द करण्यात यावे.

त्यावर सभागृहात चर्चा करून पंचायत समिती सेस सन २०२५-२६ मधील तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय मेटकरणी श्रीवर्धन कार्यालयाच्या समोर नवीन बोअरवेल मारणे (दायीत्व) रक्कम रु.१,०४,५००/-, रानवली येथे नळ पाणी पुरवठा करिता सौरऊर्जा प्रकल्प करणे,रक्कम रु. ५,००,०००/-, रानवली बौध्दवाडी येथे गटार बांधणे, रक्कम रु.२,५०,०००/- व ग्रामपंचायत वाळवटी हद्दीमध्ये बोअरवेल मारणे, रक्कम रु.१,००,०००/- ही चार कामे रद्द करणेबाबत सर्वानूमते मंजूरी देण्यात आली.

**लघु पाटबंधारे उप विभाग कोलाड:-** श्री.भटेश चव्हाण, अभियंता ग्रा.पा.पु यांनी उप विभागीय लघूपाटबंधारे उप विभाग कोलाड यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला दिला.

**बंदर विभाग:-** बंदर निरीक्षक श्रीवर्धन हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**ल.सिं.(जलसंधारण) माणगांव:-** सहाय्यक अभियंता लघु सिंचन, माणगांव हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**तालुका भुमी अभिलेख :-** उप अधिक्षक भूमी अभिलेख हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**एन.आर.एच.एम. :-** कनिष्ठ लेखाधिकारी एन.आर.एच.एम ता.आ.अ कार्यालय हे अनुपस्थित असल्यामुळे त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**शिक्षण विभाग :-** गटशिक्षणाधिकारी श्री.चव्हाण यांनी पुढील प्रमाणे आढावा दिला.

सर्व प्रथम त्यांनी श्रीवर्धन गटातील रिक्त पदांचा आढावा दिला. तालुक्यात १५८ उपशिक्षक पदे असून त्यापैकी ११२ पदे भरलेली असून मराठी माध्यमाच्या ४६ पदे रिक्त आहेत. उर्दु माध्यमाची ३८ पदे मंजूर असून २४ पदे भरलेली आहेत व १४ पदे रिक्त आहेत. एकूण १९६ शिक्षकांची पदे मंजूर असून त्यापैकी १३६ पदे भरलेली आहेत व ६० शिक्षक पदे रिक्त असल्याची माहिती दिली.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी किती शाळा या विद्यार्थ्यांअभावी बंद झाल्या आहेत? तसेच शिक्षकांची रिक्त पदे राहण्याचे कारण गटशिक्षणाधिकारी हे आहेत असे सांगितले तसेच बोर्ली येथे किती शिक्षक आहेत? व बोर्लीच्या शिक्षकांची बदली करताना शालेय व्यवस्थापण समितीला का विचारात घेतले नाही असे विचारले.

त्यावर गटशिक्षणाधिकारी श्री.चव्हाण यांनी शिक्षक भरती ही त्यांच्या अखत्यारित येत नसल्याचे सांगितले याबाबत काही अधिकार शासन, मुख्याध्यापक आणि जिल्हा परिषदेकडे असून शासनामार्फत शिक्षकांची भरती होत नाही तोपर्यंत शिक्षक उपलब्ध करून देता येणार नसल्याचे सांगितले. बोर्लीच्या मुलींच्या शाळेत ३ शिक्षक आहेत असे त्यांनी सांगितले तसेच श्री.निंबारे यांची बोर्ली येथून दिघी येथे बदली केली नसून तुर्तास व्यवस्था केली होती मात्र त्यांना परत पाठविण्यात आल्याचेही सांगितले. वर्तमानपत्रात शिक्षण विभागाबद्दल चुकिचे वार्तांकन केले जात असल्याचे सांगताना हजेरीपट हा मुख्याध्यापकांशी संबंधित असून त्याचा त्यांच्याशी संबंध नाही व शिक्षकांच्या बदलीचे अधिकार त्यांच्याकडे नाहीत असे त्यांनी सांगितले. बांधकामाचा एकही प्रस्ताव त्याच्याकडे प्रलंबित नाही तसेच विभागामध्ये त्यांच्या अनुपस्थितीचे कारण स्पष्ट करताना ते वैद्यकिय रजेवर आहेत आणि SIR चे काम ते रजेवर असतानाही ते करत असल्याचे सांगितले.

यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी गटशिक्षणाधिकारी यांना सभापती कामाबद्दल सुचना देत असताना शांतपणे सुचना ऐकून घ्याव्यात असे सांगितले तसेच गटशिक्षणाधिकारी यांची बदली प्रस्ताव जिल्ह्याला द्यावा असे सांगितले.

यानंतर रमेश चव्हाण गट शिक्षण अधिकारी श्रीवर्धन यांनी २ नवीन केंद्रप्रमुख रुजू झाले असल्याचे सांगितले.

यावर मा.सभापती श्री.सचिन किर यांनी किती केंद्रप्रमुखांची मागणी केली होती तसेच नवीन केंद्रप्रमुख कोठे रुजु झाले आहेत आणि त्यांना त्या ठिकाणी नियुक्ती कोणी दिली असे विचारले.

यावर गट शिक्षणाधिकारी यांनी एकुण १० केंद्रप्रमुखांची मागणी करण्यात आली होती मात्र त्यापैकी ६ पदे मंजुर झाली असुन बोर्ली आणि कोलमांडला येथे २ केंद्रप्रमुख रुजु झाले आहेत असे सांगितले. सदर नियुक्ती ही शासना कडुन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

यावर श्री.सूकूमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी इयत्ता आठवी पुढेही मराठी शाळांचा विस्तार करण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजे असे मत मांडले तसेच श्रीवर्धन तालुका शैक्षणिक दृष्टया प्रगत करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले पाहिजे असे सांगितले.

**<u>शा.पो.आ.</u> :-** श्री.देविदास फुंदे डाटा एन्ट्री ऑपरेटर शालेय पोषण आहार यांनी शा.पो.आ चा आढावा दिला.

शालेय पोषण आहार विभागाचा आढावा श्री.देविदास फुंदे यांनी पुढील प्रमाणे दिला तालुक्यात एकुण १०६ शाळा असून त्यापैकी ८४ शाळा जिल्हा परिषदेच्या, ५ नगरपरिषदेच्या तर उर्वरीत १७ शाळा खाजगी संस्थांच्या असल्याची माहिती दिली.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी मुलांना चांगल्या दर्जाचा आहार दिला जातो का असे विचारले.

त्यावर श्री.देविदास फुंदे हे "होय" असे म्हणाले.

यानंतर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी श्री.देविदास फुंदे यांना वेळोवेळी शाळांना भेटी देऊन शालेय पोषण आहाराची गुणवत्ता तपासण्याच्या सुचना दिल्या.

यानंतर मा.उपसभापती श्रीम पुजा प्रशांत शिंदे यांनी फॉलिक ॲसिड आणि Dewarming च्या टॅबलेट मुलांना दिल्या जातात का असे विचारले तसेच त्या नियमितपणे दिल्या जाव्यात अशी सुचना दिल्या.

यावर श्री.देविदास फुंदे हे "होय" असे म्हणाले.

**<u>सर्व शिक्षा अभियान</u> :-** श्री.वसिम शेख कनिष्ठ अभियंता यांनी सर्व शिक्षा अभियान विभागाचा संक्षिप्त आढावा दिला. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत होणारी कामे सन २०२० पासून बंद असल्याचे त्यांनी सांगितले. व सर्व शिक्षा अभियानाचे समग्र शिक्षा अभियानात रूपांतर झाले असल्याची माहिती त्यांनी दिली. शाळा बांधकाम व वर्ग खोल्या दुरूस्ती चे काम सध्या बहुतांशी DPDC व जिल्हा परिषद सेस मधून केले जाते असे त्यांनी सांगितले.

**<u>ग्राम पंचायत</u> :-**श्री.किशोर विष्णू नागे यांनी ग्रामपंचायत विभागाचा आढावा पुढील प्रमाणे दिला.

ग्रामपंचायत घरपट्टी वसूलीची एकुण मागणी ३,१३,८८,२८४ रूपये एवढी असून त्यापैकी एकुण ३,४१,३१४ एवढी वसूली असुन वसुलीची एकुण टक्केवारी १.०९% एवढी आहे. ग्रामपंचायत वीजकर वसुलीची एकुण मागणी १२,७४,३५८ असुन त्यापैकी २३,९९० रूपये एवढी वसुली असुन वसुलीची टक्केवारी १.९% एवढी आहे.ग्रामपंचायत आरोग्य कराची एकुण मागणी १३,०७,४५५ एवढी असुन त्यापैकी १२,७९,२६५ एवढी शिल्लक असून वसलीची एकुण टक्केवारी २.२% एवढी आल्याचे सांगितले. १६ वा वित्त आयोग आराखडा तयार करण्याचे काम सुरू असल्याचे माहिती त्यांनी दिली.

त्यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी घरपट्टी आणि पाणीपट्टीची खुप कमी प्रमाणात झालेली वसूली ही चिंताजनक बाब असल्याचे सांगितले. तसेच ग्रामसेवकांचे व संबंधित ग्रामपंचायतीचे दप्तर पाहण्याचा सभापतींना अधिकार आहे का असे विचारले.

यावर श्री.किशोर विष्णू नागे वि.अ पंचायत यांनी सभापतींनी तशी मागणी केल्यास त्यांना दप्तर तपासणीसाठी दिले जाईल असे सांगितले.

यानंतर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी दर महिन्याला ग्रामसेवकांचे दप्तर त्यांना पाहण्यासाठी दिले जावे असे सांगितले तसेच भोस्ते येथील श्री. मेंदाडकर या ग्रामसेवकांची बदली रद्द करण्याची ग्रामस्थांची मागणी असल्याचे सांगितले.

यानंतर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी दर महिन्याला ग्रामसेवकांचे दप्तर त्यांना पाहण्यासाठी दिले जावे असे सांगितले तसेच भोस्ते येथील श्री. मेंदाडकर या ग्रामसेवकांची बदली रद्द करण्याची ग्रामस्थांची मागणी असल्याचे सांगितले.

यानंतर मा.उपसभापती श्रीम पुजा प्रशांत शिंदे यांनी आराठी येथील स्वच्छतेबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे असे विचारले.

यावर श्री.किशोर विष्णू नागे वि.अ पंचायत यांनी आराठी येथे Dumping साठी जागेची अनुपलब्धता असल्याचे सांगितले तसेच आराठी येथे जे.सी.बी पाठवून कचरा हटविल्याचे सांगितले मात्र जागेच्या अनुपलब्धतेमुळे ही समस्या पुन्हा निर्माण होऊ शकते असे सांगितले.

**समाजकल्याण विभाग :** श्री.किशोर विष्णू नागे वि.अ पंचायत यांनी समाजकल्याण विभागाचा आढावा पुढील प्रमाणे दिला.

अनु.जाती व नवबौध्द वस्तीचा विकास करणे (दलित वस्ती सुधारणा योजना) अंतर्गत ८ कामांचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते त्यापैकी गालसुरे हरिजनवाडी अंतर्गत स्मशानभूमी दुरूस्ती व शुशोभीकरण करणे हे काम पूर्ण झाले असून ४ कामे प्रगतीत आहेत तर तीन कामे प्रशासकिय मंजुरीसाठी जिल्ह्याला पाठविले असल्याचे सागितले. तसेच ५% दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत दिव्यांगांना कृत्रिम अवयव पुरविणे दिव्यांग पालकांच्या मुलांना शिष्यवृत्ती देणे, घरकुलासाठी अर्थसहाय्य करणे, दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य देणे तसेच दिव्यांग व्यक्तींना सहाय्यभूत साधणे देणे अशा योजना समाविष्ठ असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच २०% जि.प सेस अंतर्गत उद्दीष्ठ प्राप्त नाही असे त्यांनी सांगितले.

त्यावर श्रीम.अस्मिता चोरगे यांनी दिव्यांग कल्याण निधीअंतर्गत प्राप्त झालेल्या ५ प्रस्तावांवर काय कार्यवाही करण्यात आली आहे असे विचारले.

यावर श्री.किशोर विष्णू नागे वि.अ पंचायत यांनी सर्व लाभार्थ्यांच्या खात्यावर निधीचे हस्तांरण झाले असल्याचे सांगितले.

**<u>पं.स.बांधकाम</u> :-** श्री. स्वप्निल आंधळे यांनी पंचायत समिती बांधकाम विभागाचा संक्षिप्त आढावा दिला.

**<u>पं. स. शेती</u> :-** विस्तार अधिकारी (कृषी) श्रीम.राधा कऱ्हाळे या रजेवर असल्यामुळे त्यांचा विभागाचा आढावा सहा.गट विकास अधिकारी श्री.मंगेश साळी यांनी सादर केला.

**<u>उप जिल्हा रूग्णालय:-</u>** उप जिल्हा रूग्णालय श्रीवर्धन चा आढावा डॉ.श्री. कौस्तुभ केळसकर यांनी दिला.

रूग्णालयाकडे ३ रूग्णवाहिका आहेत मात्र त्यापैकी फक्त एकाच रूग्णवाहिकेसाठी चालक उपलब्ध असल्यामुळे एका वेळी फक्त एकच रूग्णवाहिका उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले त्यामुळे रूग्णवाहिकेसाठी चालक उपलब्ध करून देण्याची त्यांनी मागणी केली. महिन्यामध्ये साधारणत: ४० ते ५० सिझरींग शस्त्रक्रिया होतात असे त्यांनी सांगितले. तसेच सोनोग्राफीसाठी डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे रुग्णालयासाठी कायमस्वरूपी रेडियोलॉजिस्ट मिळावा अशी विनंती त्यांनी केली.

यावर मा.सदस्या श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे रक्त चाचण्या केल्या जातात का? तसेच लहान मुलांचे रक्तगट माहिती असणे आवश्यक असल्याचे सांगताना याबाबत काही कार्यवाही करण्यात आली आहे का असे विचारले.

यावर उप जिल्हा रूग्णालय चे डॉ.श्री. कौस्तुभ केळसकर यांनी तालुका आरोग्य अधिकारी यांच्याशी याबाबत चर्चा करून लहान मुलांची रक्तगट चाचणी तसेच सिकल सेल चाचणी केली जाणार असल्याचे सांगितले.

त्यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी श्रीवर्धन परिसरात साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव आहे का? असे विचारले तसेच पिण्याच्या पाण्याची चाचणी घेतली जाते का असे विचारले.

यावर उप जिल्हा रूग्णालय चे डॉ.श्री. कौस्तुभ केळसकर यांनी परिसरात कोणत्याही साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव नसल्याचे सांगितले तसेच दर १५ दिवसांला पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठविले जातात मात्र उद्याप कोणत्याही पिण्याच्या पाण्याच्या नमुन्यात काही आक्षेपार्ह अथवा चिंताजनक मिळाले नाही असे सांगितले.

**<u>एम.एस.आर.एल.एम</u> :-** तालुका अभियान व्यवस्थापक श्री.स्वप्नील जाधव यांनी MSRLM विभागाचा आढावा सादर केला.

श्रीवर्धन तालुक्यात तसेच राज्यात सध्या मतदारयादीनुयार १००% महिलांना ३१ जुलै पर्यंत बचतगटात समाविष्ठ करण्याची मोहिम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र तालुक्यात स्थलांतराची समस्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे केवळ होळी पौर्णिमा आणि गणेशोत्सवासाठी गावाला हजर राहणाऱ्या महिलांना स्थलांतरीत समजावे अशा सुचना देण्यात आल्यामुळे २९,४०० महिलांपैकी केवळ ५,००० महिलांना बचतगटामध्ये समाविष्ठ करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. नवीन गट तयार करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे त्या अंतर्गत ७ नवीन बचतगटांची स्थापणा करण्यात आली आहे. बचतगटांना आधी ६०,००० एवढे अर्थसहाय्य केले जात होते. मात्र या वर्षीपासुन ९०,००० रूपयांचा अतिरिक्त निधी शासनाकडून मंजूर करण्यात आल्यामुळे आता १,५०,००० रूपयांपर्यंत अर्थसहाय्य केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी एक कोटी १८ लाख रूपयांची मागणी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी एकुण किती बचत गट कार्यरत आहेत असे विचारले.

यावर तालुका अभियान व्यवस्थापक श्री.स्वप्नील जाधव यांनी तालुक्यातील कार्यरत बचत गटांची संख्या ५२१ असल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर मा.सदस्या श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे यांनी बागमांडला गटात किती बचतगट आहेत असे विचारले तसचे त्यामध्ये नवीन सदस्यांना समाविष्ट केले जाणार आहेत का असे विचारले.

यावर तालुका अभियान व्यवस्थापक श्री.स्वप्नील जाधव यांनी बागमांडला येथे एकुण २४६ गट असून KYC च्या नवीन नियमावलीमुळे नवीन सदस्यांना समाविष्ठ केले जाणार असल्याचे सांगितले.

यावर मा.उपसभापती श्रीम पुजा प्रशांत शिंदे यांनी बचत गटांच्या स्थापणे मागे उपजीविकेच्या साधनांची निर्मिती करणे तसेच महिलांना सक्षम करणे तसेच त्यांना व्यवसाय उभारण्यासाठी प्रोत्साहित करणे हा मुळे हेतू आहे त्यामुळे ग्रामीण भागात बचतगटांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे असे सांगताना व्यवसाय करून महिलांना सक्षम करण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले. तसेच बचतगट हे फक्त पैसे जमा करुन बचत करण्यापुरतेच मर्यादित राहू नये असे ही त्यांनी सांगितले. महिलांच्या आर्थिक सक्षमतेचे तसेच ग्रामीण विकास आणि स्वयंपुर्णतेचे उद्दिष्ट पुर्ण करण्यासाठी बचतगटांचा मुळ उद्देश महिलांपर्यंत पोहोचवावा असे त्यांनी सांगितले. सर्व बचत गटांना खेळत्या भांडवलाचे मार्गदर्शन केले जाते का असे त्यांनी विचारले.

यावर तालुका अभियान व्यवस्थापक श्री.स्वप्नील जाधव हे "होय" असे म्हणाले. बचतगटांची नियमित मासिक मिटींग घेतली जाते व त्यांच्याकडून नियमीत पणे पैसे संकलित केले जातात. बचत गटांना राज्य शासनाकडुन १५,००० रुपयांचे आणि केंद्र शासनाकडुन १५,००० रूपये असे एकुण ३०,००० रुपयांचे खेळते भांडवल दिले जाते असे त्यांनी सांगितले.

त्यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी श्री.स्वप्नील जाधव यांना ते बचतगटांची एक मिटींग आयोजीत करू शकतात का असे विचारले.

यावर तालुका अभियान व्यवस्थापक श्री.स्वप्नील जाधव हे "होय" असे म्हणाले.

मा.सदस्या श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे यांनी बचत गटांना प्रशिक्षण दिले जाते का असे विचारले.

यावर तालुका अभियान व्यवस्थापक श्री.स्वप्नील जाधव यांनी बचत गटांना जिल्हा स्तरावर प्रशिक्षण देण्याचे नियोजित असल्याचे सांगितले.

**<u>टंचाई पाणी पुरवठा</u> :-** श्री.अंकुश सुर्यवंशी कनिष्ठ सहाय्यक लिपिक यांनी श्रीवर्धन तालुक्यातील पाणी टंचाईचा अहवाल दिला.

**<u>घरकुल</u>:-** श्री.आकांत सलामे वि.अ. सांख्यिकी यांनी घरकुल विभागाचा आढावा पुढील प्रमाणे सादर केला.

घरकुल निर्मीतीचे ५५५ एवढे लक्ष्य असुन त्यापैकी १९५ घरकुल पूर्ण झाले असून ३४३ प्रस्ताव प्रलंबित आहेत. स्थलांतरामुळे लाभार्थ्यांच्या मागणीनुसार ८८ प्रस्ताव रद्द करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी एका घरासाठी किती अनुदान मिळते असे विचारले.

त्यावर श्री.आकांत सलामे वि.अ. सांख्यिकी यांनी सोलर साठी ५,००० MREGS अंतर्गत २८,००० आणि १,२०,००० रूपयांचे अनुदान मिळते असे सांगितले.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर यांनी कामासाठी सोलार पॅनेल कोण पुरविणार असे विचारले.

त्यावर श्री.आकांत सलामे वि.अ. सांख्यिकी यांनी MSEB कडून सोलर पॅनेल पुरविले जाणार असल्याचे सांगितले.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम १४२ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या नियम १९६४ व नियम ५ अन्वये रायगड जिल्हा परिषदेचा सन २०२५-२६ चा वार्षीक प्रशासन अहवाल तयार करणे कामी पंचायत समिती श्रीवर्धनचा वार्षीक प्रशासन अहवाल मंजुरीसाठीचा ठराव श्री.आकांत सलामे विस्तार अधिकारी सांख्यिकी यांनी मांडला. सदर ठरावावर सभागृहामध्ये सर्व सदस्यांनी चर्चा करून सर्वानुमते ठरावास मंजूरी देण्यात आली आहे.

**विषय क्र. ७ :- पुढील सभेची तारीख व वेळ ठरविणे.**

पंचायत समिती श्रीवर्धनची पुढील मासिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक १४/०८/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पंचायत समिती श्रीवर्धनच्या महाराष्ट्र भूषण आदरणीय ती.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेण्याचे सर्वानुमते ठरले.

**विषय क्रमांक. ८ :- मा.सभापती सो. यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करणे.**

पंचायत समिती श्रीवर्धन कार्यालयातील स्वच्छता करणारे कर्मचारी यांचे मानधन १००० हजार रूपये वाढवून ३००० ऐवजी ४००० करणे बाबत चर्चा करण्यात आली व त्यास सर्व सदस्यांकडून अनुमती देण्यात आली.

सभेचा समारोप करतांना मा. सहा गट विकास अधिकारी पंचायत समिती, श्रीवर्धन यांनी, सदर सभेत सन्माननीय सदस्य यांनी मांडलेल्या मुद्याबाबत पुर्तता करावी तसेच आगामी सभेपुर्वी सदर सभेतील चर्चेप्रमाणे माननीय सदस्य यांना माहिती देण्यात यावी तसेच सभेस उपस्थित मा. सभापती श्री. सचिन नंदाकर किर, मा. उप सभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे, मा. पं.स.सदस्य श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर. मा.पं.स.सदस्या श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे, यांचे तसेच सभेस उपस्थित खातेप्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानले. सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानुन मा. सभापती सो., यांचे वतीने सभा संपल्याचे जाहीर केले.

**सचिव तथा गटविकास अधिकारी (वर्ग-१)**
**पंचायत समिती, श्रीवर्धन**

**(श्री.सचिन नंदाकर किर)**
**सभापती**
**पंचायत समिती, श्रीवर्धन**

# पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभा (इतिवृत्त भाग -२)

| सभेची तारीख व वेळ | प्रस्तावाचा विषय | प्रस्तावाचा मजकूर | सूचक अनुमोदक | दुरुस्ती असल्यास | | दिलेल्या मतांची संख्या | | दुरुस्ती नंतर मतदाना नंतर अंतिम निर्णय | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सूचक | अनुमोदक | बाजूने | विरुध्द | मजकूर | ठराव क्र. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | **<u>दु:खवटा ठराव</u>** | | | | | | | |
| **दिनांक: १५/०७/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता** | **<u>दु:खवटा ठराव</u>** | **१) ठराव क्रमांक :-२१**<br>कै. श्रीम.नमिता निळकंठ सातनाक यांचे दिनांक २९/०६/२०२६ रोजी आकस्मिक निधन झालेबद्दल हि पंचायत समितीची सभा दु:खवटा व्यक्त करित आहे..<br>सूचक:- मा.श्री.सचिन नंदाकर किर, सदस्य<br>ठराव सर्वानुमते मंजूर-**२१** | | | | | | | |
| | **<u>अभिनंदन ठराव</u>** | **<u>अभिनंदन ठराव</u>**<br>अभिनंदन ठराव नव्हते | | | | | | | |
| | **विषय क्रमांक:-१** मागिल महाच्या मासिक सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे | **पुर्तता**<br>पंचायत समितीच्या मागिल सभेच्या इतिवृत्तावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा भाग एक मध्ये नमुद केल्याप्रमाणे घेणेत आला. तसेच दिनांक १७/०६/२०२६ रोजी सभेचे ईतीवृत्त मंजुर करणेत आले. | | | | | | | |
| | **विषय क्रमांक:-२** मागिल महाच्या मासिक सभेतील ठराव पुर्तता आढावा घेणे. | **पुर्तता**<br>मागिल महाच्या मासिक सर्वसाधारण सभेचे ठराव पुर्तता करणेत आली आहे. | | | | | | | |

# पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभा (इतिवृत्त भाग -२)

| | | |
|---|---|---|
| | **विषय क्रमांक:-३**<br>मा.सदस्यांनी विचारलेल्या लेखी प्रश्नांना उत्तरे देणे. | **पुर्तता**<br>इतिवृत्त भाग-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे. |
| | **विषय क्रमांक:- ४**<br>सन्मा.सदस्यांच्या रजेच्या अर्जास मंजूर देणे. | **पुर्तता**<br>इतिवृत्त भाग-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सन्मा. पंचायत समिती सदस्यांचे रजेचे अर्ज नाहीत. |
| | **विषय क्रमांक:- ५**<br>महत्वाच्या पत्रव्यवहाराचे वाचन करणे. | **पुर्तता**<br>इतिवृत्त भाग-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे महत्वाचे पत्रव्यवहार वाचनासाठी नव्हते. |
| | **विषय क्रमांक:- ६**<br>विकास कामांचा आढावा घेणे. | **पुर्तता**<br>खाते प्रमुख, पशुधन विकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, उप अभियंता (बांधकाम), बाल विकास प्रकल्प अधिकारी, उप अभियंता (ग्रा.पा.पु),ग.शि.अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (सर्व), शाखा अभियंता (बांध.) (प्रभारी), कनिष्ठ अभियंता इ. मागील महात केलेल्या कामांचा आढावा सभागृहाला दिला. |
| | **विषय क्रमांक:-**<br>**६ (३) (१)** | **१) ठराव क्रमांक :-२२**<br>पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभा दिनांक १६/१२/२०२५, ठराव क्र. **१२** अन्वये सन २०२५-२६ अंतर्गत ४ इमारत दळणवळण लेखाशिर्षा खाली ग्रामपंचायत आराठी हद्दीतील अंतर्गत रस्ता तयार करणे रक्कम रु. ३७००००/- व दिनांक १६/१२/२०२५, ठराव क्र. **१३** अन्वये ग्रामपंचायत बागमांडला कोळीवाडा अंतर्गत रस्ता तयार करणे, रक्कम रु. ३७००००/- अन्वये कामे मंजूर करणेत आले होते. परंतू ही पंचायत समिती सभा वरिल दोन्ही कामे रद्द करणेबाबत ठरावास सर्वानूमते मंजूरी देण्यात येत आहे.<br><br>सूचक:- मा.श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर, सदस्य, पं.स<br>अनुमोदक:- मा.श्री.सचिन नंदाकर किर, सभापती<br>ठराव सर्वानुमते मंजूर-**२२** |

# पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभा (इतिवृत्त भाग -२)

| | | |
|---|---|---|
| | **विषय क्रमांकः- ६ (३) (१२)** | **२) ठराव क्रमांक :-२३**<br>पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभा दिनांक २९/०१/२०२५, प्रशासकिय आदेश क्र. **१** अन्वये सन २०२५-२६ अंतर्गत ९ सार्वजनिक आरोग्य लेखाशिर्षा खाली तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय मेटकर्णी श्रीवर्धन कार्यालयाच्या समोर नवीन बोअरवेल मारणे (दायीत्व) रक्कम रु.१,०४,५००/-, दिनांक १६/१२/२०२५, ठराव क्र. **१५** अन्वये रानवली येथे नळ पाणी पुरवठा करिता सौरऊर्जा प्रकल्प करणे,रक्कम रु. ५,००,०००/-, दिनांक १६/१२/२०२५, ठराव क्र. **१६** अन्वये रानवली बौध्दवाडी येथे गटार बांधणे, रक्कम रु.२,५०,०००/- व दिनांक १६/१२/२०२५, ठराव क्र. **१४** अन्वये ग्रामपंचायत वाळवटी हद्दीमध्ये बोअरवेल मारणे, रक्कम रु.१,००,०००/- कामे मंजूर करणेत आले होते. परंतू ही पंचायत समिती सभा वरिल सर्व कामे रद्द करणेबाबत ठरावास सर्वानूमते मंजूरी देण्यात येत आहे.<br><br>सूचकः- मा.श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर, सदस्य, पं.स<br>अनुमोदकः- मा.श्री.सचिन नंदाकर किर, सभापती<br>ठराव सर्वानुमते मंजूर -**२३** |
| | **विषय क्रमांकः- ६ (३) (२८)**<br>**<u>ठराव</u>**<br>पं.स वार्षिक प्रशासन अहवाल सन २०२५-२६ | **१) ठराव क्रमांक :-२४**<br>१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १४१ (१) अन्वये पंचायत समितीचा मागील वित्तीय वर्षाचा प्रशासन अहवाल तयार करुन तो प्रसिद्ध करण्याचा आहे. अधिनियम १९६४ मधील तरतुदीनुसार पंचायत समिती श्रीवर्धन सन २०२५-२६ चा वार्षिक प्रशासन अहवाल गट विकास अधिकारी पंचायत समिती श्रीवर्धन यांनी तयार केला आहे त्यास ही पंचायत समितीची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br><br>सूचकः- मा.श्रीम.पुजा प्रशांत शिंदे, उपसभापती<br>अनुमोदकः- मा.श्री.सचिन नंदाकर किर, सभापती<br>ठराव सर्वानुमते मंजूर-**२२** |

| | | |
|---|---|---|
| | **विषय क्रमांक:- ६ (३) (२९)**<br>**<u>ठराव</u>**<br>पं.स.सेसमधून पंचायत समिती कार्यालयातील नियमित शौचालय स्वच्छता हातपावतीवर माहे ऑगस्ट २०२६ पासून वाढ करणे बद्दल. | **१) ठराव क्रमांक :-२५**<br>पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभा दिनांक ०७/१२/२०२१,ठराव क्र.४८२ अन्वये पंचायत समिती कार्यालयातील शौचालयांची स्वच्छता "स्वच्छक" दररोज करतात त्यासाठी त्यांना दरमहा पं.स.सेस मधून रक्कम रुपये ३०००/- माहे डिसेंबर २०२१ पासून हातपावतीवर देत होतो.सदर स्वछतेकरीता लागणारे साहीत्य हे पंचायत समितीने पुरविणेचे आहे असा ठराव यापुर्वी घेणेंत आला होता.सदरचे स्वच्छक हे माझ्याकडे हातपावतीमध्ये वाढ करावी अशी वारंवार विनंतीवरुन मागणी करीत आहेत. तरी माहे ऑगस्ट २०२६ पासून "स्वच्छक" यांचे हातपावतीमध्ये रक्कम रुपये १०००/- ने वाढ करुन त्यांना दरमहा रक्कम रुपये ४०००/- हातपावतीने करणेंत येवून दर महा देणेंत यावी.असा ठराव सभागृहात मांडला त्याला सर्वानुमते मंजूरी देणेंत आली.<br><br>सूचक:- मा.श्री.सचिन नंदाकर किर, सभापती<br>अनुमोदक:- मा.श्रीम. मुजा प्रशांत शिंदे, उपसभापती<br>ठराव सर्वानुमते मंजूर-**२५** |
| | **विषय क्रमांक :- ७**<br>पुढील सभेची तारीख व वेळ ठरविणे. | पुर्तता<br>पंचायत समिती श्रीवर्धनची मासिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १४/०८/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता महाराष्ट्र भूषण आदरणीय तीर्थ.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह पंचायत समिती श्रीवर्धन येथे घेण्याचे सर्वानुमते ठरले. |
| | **विषय क्रमांक:-८**<br>मा.सभापती सो.,यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करणे. | पुर्तता<br>मा.सभापती सो., यांच्या परवानगीने चर्चेला येणारे आयत्या वेळेचे विषय नव्हते. |



**सचिव तथा गटविकास अधिकारी (वर्ग-१)**
**पंचायत समिती, श्रीवर्धन**



**सभापती**
**पंचायत समिती, श्रीवर्धन**

# पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभा (इतिवृत्त भाग -२)